# ९७ व्या घटना दुरूस्तीच्या निमित्ताने - सावध व्हावे !

**(१२ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रसिध्द)**

सहकार कायद्यामध्ये करण्यात आलेली ९७ वी घटना दुरूस्ती येत्या १५ फेब्रुवारी २०१३ रोजी अंमलात येणार आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाने राज्यातील आपल्या सहकार कायद्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. अन्यथा घटना दुरूस्तीप्रमाणे सर्व तरतुदी लागू होणार आहेत, **याची राज्याच्या मा. सहकार आयुक्त यांना माहिती आहेच.**



सहकारी चळवळींमुळे आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण भागात व शहरी भागातसुध्दा उर्जीतावस्था आलेली आहे. परंतु अलीकडच्या काळात या सहकारी चळवळींची राज्यात घसरण होण्यास वेगाने सुरूवात झालेली आहे. सहकारातील तथाकथित अपप्रवृत्ती, सोयीच्या वेळेस राजकीय हस्तक्षेप, संशयातीत प्रशासकीय नियंत्रण ही कारणे सहकारी संस्थांना अडचणीत आणण्यास कारणीभूत ठरलेली आहेत. म्हणून संपुर्ण भारत देशात सहकारी चळवळीत सुसूत्रता आणणे, माजोरी व उन्मत्त राजकीय हस्तक्षेप व प्रशासकीय हस्तक्षेपास लगाम घालणे, सहकारी संस्थांच्या सभासदांचेच हित जोपासणे, ह्या व्यापक उद्देशासाठी भारत सरकारने नागरिकांना सहकारी संस्था स्थापन करण्याचा घटनात्मक आधार दिलेला आहे. हेच औचित्य साधून नागरिकांनी ऐच्छिक दृष्टया एकत्र यावे, संस्थेचे कामकाज लोकशाही तत्त्वाने कर्रीवे, त्यात स्वत: सक्रीय होऊन संस्थांच्या कारभारात सहभागी व्हावे व त्याचा आर्थिक, सामजिक लाभ घ्यावा ह्याच मूळ हेतूने घटनेतच दुरूस्ती केलेली आहे, व नागरिकांना मुलभूत अधिकार सुध्दा दिलेले आहेत.

**ज्या राज्यांमध्ये सहकार कायदा अस्तित्वात आहे, त्यांनी तो १५ फेब्रुवारी २०१३ नंतर घटनेच्या सर्व तरतुदी लागू होतील आणि त्या तत्त्वाशी विसंगत कायदा किंवा नियम असतील, ते आपोआप अवैध ठरतील, अशीच तरतूद केलेली आहे.** आता ही बाब बहुतांशी कार्यकर्त्यांना ज्ञात झाली असावी किंबहुना हे ज्ञात असावे हे अभिप्रेत आहे.

९७ व्या घटना दुरूस्तीच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्यात मोठे विचारमंथन घडवून आणून घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ विचाराला आत्तापर्यंत

सहकारी चळवळीच्या व्यवस्थेने कशी बगल दिली, याची अनेक उदाहरणे सर्वश्रूत आहेत. घटनेप्रमाणे न्याय मिळत नाही, म्हणून मोठ्या संख्येने नागरी व सहकारी संस्थांचे सभासद हे न्यायदेवतेकडे न्यायाची अपेक्षा करीत आहेत. हजारो दावे राज्याच्या विविध न्यायालयांमध्ये व सुप्रीम कोर्टामध्ये न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. याचाच अर्थ असा की, सहकारी कायदा व इतर कायदे याची अंमलबजावणी करताना शासनाकडून न्याय दिला जात नाही. म्हणून आता स्वत:हून राज्य शासनाने मा. सहकार आयुक्त यांच्या माध्यमातून न्याय देण्याची वेळ आलेली आहे.

राज्यातील २ लाख २७ हजारांच्यावर सहकारी संस्था व त्यासाठी अस्तित्वात असलेला सहकार कायदा व ह्या सर्वांवर मुख्य नियंत्रक म्हणून काम करणारे राज्याचे मा. सहकार आयुक्त यांनी आता तरी राज्याच्या साडेअकरा कोटी जनतेला आर्थिक न्याय देण्यासाठी पाऊले उचलली पाहिजेत. पतसंस्थांना सभासदांना द्यावयाच्या कर्जातून ठेवींची कपात करण्यास बंदी आहे. परंतु सहकारी साखर कारखान्याना मंत्री समितीच्या आदेशाने मा. साखर आयुक्त हे साखर कारखान्यांस शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून प्रतिवर्षी प्रती टनामागे ठेवी व इमारत निधी कपात करण्यास मुकसंमती देते. हे सर्व कपतीचे काम सहकार कायद्याच्या विरोधात १००टक्के असून देखील राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी आतापर्यंत हजारो कोटी रुपये ऊस उत्पादकांचे भर दिवसा दरोडा टाकल्यासारखे लुटलेले आहेत. परंतु त्या विरोधात शासनाने, शासकीय लेखापरिक्षकानी, मा. साखर आयुक्तांनी, मा.सहकार आयुक्तांनी, पोलिस यंत्रणेने ह्या साखर कारखानांच्या संचालक मंडळावर कुठलीही दिवाणी अथवा फौजदारी कारवाई केली नाही. राज्याच्या कुठल्याही साखर कारखान्याचे संचालक मंडळ वरील कारणास्तव बरखास्त केले नाही. कलम ८३ नुसार साधी चौकशी सुद्धा केली नाही. राज्यातील २०० च्या वर सहकारी साखर कारखान्यांतील संचालक ह्या कृतीमुळे जेलमध्ये अद्याप डांबलेले नाहीत. अनेक साखर कारखान्यांनी राज्यातील अनेक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँकेमधून हजारो कोटी रुपयांचे कर्ज वर्षानुवर्षे थकवून आता डुबविल्यात जमा आहे.आणि ह्या लूटमारीत अनेक **आजी माजी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती सदस्य, पदाधिकारी अशा विविध २०० च्या दरम्यान मुख्य दरोडेखोरांनी जनतेचे पैसे सायफन करून हडप केलेले आहेत. हे अत्यंत चीड आणणारे कृत्य मुळापासून उखडून**

**काढण्यासाठी ९७ वी घटना दुरूस्ती हा चांगला मुहूर्त आहे.** राज्याच्या मा. सहकार व साखर आयुक्तांनी कोणाचाही मुलाहिजा न ठेवता बेकायदेशीर आदेश देणाऱ्यांच्या विरोधात बंड पुकारले पाहिजे. पतसंस्थांमधल्या ज्या ठेवीदारांना वेळेवर ठेवी परत मिळाल्या नाहीत, त्या पतसंस्था संचालक मंडळ बरखास्त केले. त्यामधील संचालकांना जेलमध्ये डांबले. त्यांची स्थावर मालमत्ता विक्रीस काढली. मग ह्या साखर कारखान्याच्या संचालकांच्या विरोधात ही कृती का झाली नाही ? सहकार कायदा दोघांनाही सारखाच. ह्याचेच उत्तर देण्याची वेळ ९७व्या घटना दुरुस्तीच्या निमित्ताने वरील आयुक्तांना प्राप्त झालेली आहे. ह्या संधीचे सोने जर ह्यावेळेस शासकीय अधिकाऱ्यांनी जर केले नाही तर भविष्यकाळ कोणास माफ करेल अशी परिस्थिती नाही.

**बँका व पतसंस्थांचे लेखापरिक्षण शुल्क समान असावेत किंबहुना बँकापेक्षा ५ ते १० पटीने पतसंस्थांचे लेखापरिक्षण शुल्क आकारणे हे घटने विरूध्द आहे यासाठी आमच्या सारखे कार्यकर्ते वर्षानुवर्षे संघर्ष करीत आहे.** परंतु यासाठी गेली २० वर्षे मायबाप सरकारकडे आश्वासने मिळवून यशस्वी झालो नाही. दिलेला शब्द व जाहीर आश्वासन न पाळणारा इतिहास पुसण्याची हीच वेळ आहे. राज्यात अनेक आय.ए.एस्.अधिकारी हे प्रसंगी कोणाचेही बेकादेशीर आदेश न ऐकणारे आहेत. आणि ह्याच पध्दतीने मा. सहकार आयुक्त व साखर आयुक्तांनी वागावे हे महाराष्ट्राला अभिप्रेत आहे. शेतकऱ्यांचे रक्त शोषणाऱ्यांच्या विरोधात घेतलेल्या कर्जाच्या व्यतिरिक्त कुठलीही कपात करु न देणारे मा. साखर आयुक्त महाराष्ट्राला हवे आहेत. व शेतकऱ्यांच्या बेकायदेशीर कपात केलेल्या ठेवी व इतर देणगी रकमा, वर्गण्या कपात करणाऱ्यांना व ठेवीवरील व्याज न देणाऱ्यांना जेलमध्ये टाकणारे आयुक्त राज्याला हवे आहेत. आणि येथून पुढे कोणाचाही उन्मत्तपणा व माजोरीपणा लोक स्विकारतील अशा भ्रमात राहणे हे स्वप्नरंजन ठरणार आहे. यासाठी घटनेच्या समानतेला किंबहुना त्याच्या अंमलबजावणीला कोणालाही छेद देता येणार नाही. यासाठी या अग्रलेखातून आम्ही पूर्व सूचना देत आहोत. कारण 'बदल' हा निसर्गाचा नियम आहे. सावध व्हावे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**